# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत**

**(१) १५१७६ (०९-०४-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमध्ये ४९ अनुदानित व ९४ विनाअनुदानित शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या वयोमानानुसार जागा व डेस्क मिळण्यासह शिक्षक, लिपिक, शिपाई, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक, विशेष शिक्षक यांच्या रिक्त जागा भरणे व धोरण ठरविणे, विज्ञान व भूगोल प्रयोग शाळांसाठी आवश्यक साहित्य मिळणे, शासन निर्णय, परिपत्रकांनुसार मिळणारे फायदे व सवलतींचा लाभ, बंद केलेले सानुग्रह व रजा प्रवास भत्ता इ. विविध मागण्या गेली अनेक वर्षे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागण्यांची पूर्तता करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१७) :**(१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांकरिता वयोमानानुसार डेस्क मिळण्याकरिता सुरु असलेली निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ च्या संचमान्यतेनुसार अनुदानित व विनाअनुदानित माध्यमिक शाळांमधून अतिरिक्त झालेले शिक्षक बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधून कामाच्या व्यवस्थेअंतर्गत इंग्रजी माध्यमाचे शिक्षक भरतीची कार्यवाही सुरु आहे.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्याबाबतीत आकृतीबंध तयार करण्याचे काम सुरु असल्यामुळे सन २०१६-१७ च्या संचमान्यतेत विशेष शिक्षक/शिक्षकेतर संवर्गातील पदे दर्शविण्यात आलेली नाहीत.

प्रतिशाळा विशेष शिक्षक/शिक्षकेतर संवर्गातील अनुज्ञेय पदे संचमान्यतेत दर्शविण्यात आल्यानंतर लिपिक, शिपाई, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक, कामाच्या व्यवस्थेंतर्गत करिता शासनाकडून संचमान्यतेच्या प्रती प्राप्त न झाल्यामुळे शिक्षक, लिपिक, शिपाई, ग्रंथपाल प्रयोगशाळा सहाय्यक, विशेष शिक्षक या संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

सद्य:स्थितीत खाजगी प्राथमिक अनुदानीत शाळांमध्ये अतिरिक्त झालेल्या लिपिक कामाच्या व्यवस्थेंतर्गत माध्यमिक शाळांमधून कार्यरत आहेत.

महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील विज्ञान प्रयोगशाळांमध्ये प्रयोगशाळा साहित्याची खरेदी करण्यात आली असून तेथे भूगोल प्रयोगशाळा अस्तित्वात नाही.

वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णय परिपत्रकान्वये महागाई भत्ता वाढ, शिक्षक संवर्गाकरिता निवडश्रेणी, वरिष्ठ वेतनश्रेणी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता कालबध्द पदोन्नतीचा विशेष शिक्षक यांच्या रिक्त पदांची संख्या निश्चित होऊ शकत नाही. तथापि सन २०१४-१५ करिता शासनाकडून संचमान्यतेच्या प्रती प्राप्त झाल्यानंतर सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल. महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील विज्ञान प्रयोगशाळांमध्ये प्रयोगशाळा साहित्याची खरेदी करण्यात आली असून महापालिका शाळांमध्ये भूगोल प्रयोगशाळा अस्तित्वात नाही.

शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या परिपत्रकान्वये महागाई भत्ता वाढ, शिक्षक संवर्गाकरिता निवडश्रेणी, वरिष्ठ वेतनश्रेणी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता कालबध्द पदोन्नतीचा अद्यापर्यंत लाभ देण्यात आला असून, सन २०१७-१८ मध्ये लाभार्थी कर्मचाऱ्यांची माहिती संकलनाची कार्यवाही सुरु आहे.

माध्यमिक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची वेतनश्रेणी व माध्यमिक शाळा संहिता लागू असल्यामुळे सानुग्रह व रजा प्रवास भत्ता अनुज्ञेय नाही.

---

## वडगाव बुद्रुक (जि.पुणे) येथे नदीच्या पात्रात विठ्ठलवाडी ते वारजे रस्त्यावर उभारलेल्या इमारतीमुळे नदीला पुराचा धोका निर्माण झाल्याबाबत

**(२) ३५४१२ (२०-०१-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे वडगाव बुद्रुक (जि.पुणे) येथे मुठा नदीच्या पात्रात विठ्ठलवाडी ते वारजे रस्त्यावर उभारलेल्या इमारतीच्या विरोधात हरित लवादाने सहा महिन्यांपूर्वी निकाल देताना हा भाग पूररेषेत येत असून तो काढून टाकण्याचे आदेश पुणे महानगरपालिकेला दिले आहेत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, त्यामुळे महानगरपालिकेसह अन्य कुठल्याही सरकारी यंत्रणेला नदीपात्रात कोणतेही काम करताना पाटबंधारे विभागाची परवानगी घ्यावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत हरित लवादाने दिलेल्या निर्णयानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, यापुढे नदीपात्राजवळ बांधकामे होऊ नयेत म्हणून कोणती उपाययोजना व कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१७)** :(१) व (२) मा.हरित लवाद यांनी अर्ज क्र.२/२०१३ व ५२/२०१४ मध्ये मुठा नदीपात्रालगत विठ्ठल मंदीर ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ पर्यात ब्ल्यु लाईन मध्ये येणाऱ्या अनधिकृत बांधकामाबाबत योग्य ती कायदेशीर कार्यवाही करणेबाबत आदेश दिले आहेत हे खरे आहे.
(३) मुठा नदीपात्रालगत स.नं.चे संदर्भेत जागेवर व विकास आराखड्यावर ब्ल्यू लाईन आखणीचे काम सुरु असून सदर आखणीचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष ब्ल्यू लाईनमध्ये येणाऱ्या इमारतीबाबत पुढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही करणेत येईल.

तसेच विठ्ठल मंदीर ते राष्ट्रीय महामार्ग क्र.४ दरम्यान मुठा नदीपात्रालगत ब्ल्यू लाईन मधील २४.०० मी. डी.पी. रस्त्यामध्ये शाम सुंदर सोसायटीची इमारत येत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर सोसायटीला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६८ (बी) व (सी) ची नोटीस दि. २०.०४.२०१३ अन्वये देण्यात आली आहे. सदर नोटीस विरुध्द सोसायटीने मे दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर) यांचे न्यायालयात दिवाणी दावा ८९९/२०१३ दाखल केला असून सदर दावा मे.कोर्टाने फेटाळला आहे. सदर मे कोर्टाचे निर्णयाविरुध्द शामसुंदर सोसायटी ने जिल्हा न्यायालयात अपील क्र.२१/२०१४, दि. ३.५.२०१४ रोजी दाखल केले असून सदर अपिलावर कोर्टात सुनावणी सुरु आहे.
(४) पुणे महानगरपालिकेने क्षेत्रिय कार्यालय निहाय पदनिर्देशित अधिकारी यांची नेमणूक केलेली असून त्यांचे मार्फत अनधिकृत बांधकामास नोटीस देऊन कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) हद्दीतील नेतिवली विभागातील झोपडपट्ट्या नियमित करून मालकी हक्क मिळवण्यास होत असलेल्या विलंबाबाबत**

**(३) ४११६३ (१७-०५-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) हद्दीतील नेतिवली विभागातील जवळपास ६० ते ७० वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या झोपड्या नियमितपणे कर भरीत असून शासनाने या ठिकाणी सार्वजनिक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदरची जागा विमानतळाची असल्याचे कारण दाखवून विमानतळाच्या हद्दी पक्क्या करून घेण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील अनेक वर्षापासून उभ्या राहिलेल्या झोपड्यांना नियमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील नेतिवली विभागात ३० ते ४० वर्षांपासून झोपडपट्ट्या अस्तित्वात आहेत.

सदर भागाचा महानगरपालिकेच्या बृहत नागरी क्षेत्रात समावेश झाल्यापासून नागरिकांना महानगरपालिकेतर्फे पाणीपुरवठा, शौचालय, दिवाबत्ती, पायवाटा, गटारे इत्यादी मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

(२) भूमि अभिलेख, कल्याण कार्यालयाकडून मौजे नेतिवली, ता.कल्याण, जि.ठाणे येथील सर्वे क्र.११ + १२/३ + १२/४ + १२/५ ची हद्द कायम मोजणी करण्यात आली आहे.

(३) गृहनिर्माण विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या तरतूदी दि.३० नोव्हेंबर, १९८३ च्या अधिसूचनेन्वये कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राकरीता लागू करण्यात आल्या आहेत. तसेच गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय दि.१६/०५/२०१५ अन्वये दि.०१/०१/२००० या अर्हता दिनांक रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या शासकीय, निमशासकीय व खाजगी जमिनीवरील घोषित, तसेच गणनाकृत झोपडीत सध्या प्रत्यक्ष रहात असलेल्या झोपडीवासियांचा निवारा संरक्षित करण्यात आला असून, याबाबतची कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई महानगरपालिकेने सिडकोकडे विविध सामाजिक उपक्रमासाठी भूखंड उपलब्ध होण्याकरीता केलेल्या मागणीबाबत**

**(४) ४४१३५ (०३-०५-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेने सिडकोकडे विविध सामाजिक उपक्रमासाठी भूखंड मिळावेत याकरीता मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण किती भूखंडाची मागणी करण्यात आली आहे, वा त्यापैकी किती भूखंड उपलब्ध करुन देण्यात आले आहेत, उर्वरित भूखंड उपलब्ध करुन देण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, नवी मुंबईतील महिला बचत गटांनी मागणी केल्यापैकी त्यांना केवळ दोनच भूखंड उपलब्ध करुन देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उर्वरित भूखंड उपलब्ध करुन देण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) नवी मुंबई महानगरपालिकेने विविध नागरी सुविधा प्रयोजनाकरीता एकूण ४०१५ भूखंडांची आरक्षणनिहाय सिडकोकडे मागणी केली आहे. त्यानुसार एकूण १५५ भुखंड सिडकोने नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेले आहेत. सद्यस्थितीत सिडकोमार्फत ३८६० भुखंडांचे हस्तांतरण प्रलंबित आहे. सदर भुखंडांमध्ये सिडकोच्या २०१० विकास आराखड्यात आरक्षित असलेले विविध वापराचे भुखंड आहेत.
(३) होय.

नवी मुंबई महानगरपालिकेस महिला सक्षमीकरण केंद्र या प्रयोजनासाठी सिडकोकडून घणसोली सेक्टर ०६, भूखंड क्र.१७, क्षेत्रफळ २९५.८१ चौ.मी., तसेच कोपरखैरणे सेक्टर १०, भूखंड क्र.०९, क्षेत्रफळ २९१.०८७ चौ.मी. अनुक्रमे दि.२३/०८/२०११ व दि.१४/०८/२०१३ रोजीच्या करारनाम्यान्वये हस्तांतरीत झाले आहेत.
(४) नवी मुंबई महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून हस्तांतरीत भूखंडांपैकी सुयोग्य भूखंडांची निवड सिडकोच्या संमतीने आवश्यक त्या वापरासाठी करता येईल, असे सिडकोने दि.१७/०६/२०१६ च्या पत्रान्वये नवी मुंबई महानगरपालिकेस कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या अध्यादेशानुसार अपंग कल्याणासाठी शिक्षण, रोजगार यासह अन्य बाबींसाठी तीन टक्के निधी नागरी भागात आरक्षित ठेवणे आवश्यक असल्याबाबत**

**(५) ४९९३१ (२८-०४-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या वतीने अपंग कल्याणासाठी समान संधी संरक्षण सहभाग कायदा सन १९९६ पासून लागू केला असून त्यानंतर राज्य शासनाच्या वतीने २८ ऑक्टोबर, २०१५ रोजी अध्यादेश निर्गमित करीत शिक्षण, रोजगार यासह अन्य बाबींसाठी तीन टक्के निधी नागरी भागात आरक्षित ठेवणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, असे असतानाही सर्वच शासकीय विभागांनी त्या निर्णयाकडे दुर्लक्ष केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अपंगांना अनेक सवलती या अध्यादेशामध्ये नमूद असूनही नाशिक जिल्ह्यातील महापालिका, नगर परिषदांसह सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांचे दुर्लक्ष झाल्याने अपंगांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या अध्यादेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१७)** :(१) नगर विकास विभागाने दि.३०/१०/२०१० च्या शासन परिपत्रकान्वये सर्व महानगरपालिका/ नगरपालिकांना दिव्यांग व्यक्तींसाठी ३% निधी राखीव ठेवण्याचे कळविण्यात आले असून, सदर निधी खर्च करण्याकरीता दि.२८/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.
(४) दिव्यांग व्यक्तींकरीता राखीव निधी इतरत्र न वळविण्याबाबत सर्व महानगरपालिका तसेच आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांना दि.३० एप्रिल, २०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच अपंगांच्या योजनेचा नियमीत आढावा घेण्यासाठी सर्व विभागीय आयुक्तांना दि.११/०७/२०१७ च्या बैठकीच्या इतिवृत्तान्वये कळविण्यात आलेले आहे.

---

**मुंबईतील उड्डाणपुलावरील ५५२ मोबाईल टॉवरपैकी २४० टॉवर अवैध असल्याबाबत**

**(६) ५८४४८ (२९-०८-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील उड्डाणपुलावरील ५५२ मोबाईल टॉवरपैकी २४० टॉवर अवैध असल्याची बाब माहिती अधिकारात मागविलेल्या माहितीतून माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बाबींची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध मोबाईल टॉवर हटविण्याबाबत शासन तातडीने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१७) :**(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या उड्डाणपूलांवर मोबाईल टॉवर्स आढळून आले नाहीत.
तथापि, एमएमआरडीए मार्फत बांधण्या आलेल्या व कालांतराने महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या लालबाग व किंग्ज सर्कल येथील उड्डाणपुलावर मोबाईल टॉवर आढळून आले आहेत.
(२) व (३) सदर मोबईल टॉवर्सची तपासणी करुन त्यावर नियमानुसार उचित कार्यवाही करण्याबबतच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिका व एमएमआरडीए यांना दिनांक ०६.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

---

**मुंबईचे नवनिर्माण करण्यासाठी शासनाने गृहनिर्माण धोरण जाहिर केल्याबाबत**

**(७) ६५२१३ (१६-१२-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या, जीर्ण झालेल्या चाळींचा विकास करण्यासाठी व एकूणच मुंबईचे नवनिर्माण करण्यासाठी शासनाने गृहनिर्माण धोरण दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी जाहिर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जाहिर करण्यात आलेल्या गृहनिर्माण धोरणामुळे मुंबईतील किती जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लागणार आहे,
(३) असल्यास, सदर धोरणाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व याबाबतची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२८-०९-२०१७) :**(१) दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी घाटकोपर, मुंबई येथे मा. मंत्री (गृहनिर्माण) यांनी गृहनिर्माण धोरण जाहिर केले आहे.
(२) मुंबई उपनगर क्षेत्रातील व मुंबई बेट शहरामधील बिगर उपकर धोकादायक असलेल्या भाडेकरुव्याप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्यासाठी बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नवीन विनियम ३३ (७) (अे) अंतर्भूत करणेचा निर्णय घेतलेला आहे. यासंदर्भात नागरीकांच्या सूचना / हरकती मागविणारी सूचना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३३ (१अेअे) अन्वये दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी नगर विकास विभागाकडून प्रसिध्द करण्यात आलेली आहे. यासंदर्भात वैधानिक कार्यवाही पूर्ण झालेली असून लवकरच अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यात येत आहे.
(३) दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी घोषित करण्यात आलेल्या गृहनिर्माण धोरणामध्ये मुंबई उपनगरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या भाडेतत्वावरील इमारतींमधील भाडेकरुंच्या पुनर्वसनाकरीता सदर इमारतींच्या पुनर्विकासामध्ये प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्र अनुज्ञेय करण्याची बाब अंतर्भूत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करीरोड रेल्वे स्थानक ते साईबाबा मार्ग या परिसरातील मोनोरेल विद्युत पुरवठा करणारा वीज वाहक रेल निखळल्याबाबत**

**(८) ६५२३० (१३-०२-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करीरोड रेल्वे स्थानक ते साईबाबा मार्ग या परिसरातील मोनोरेल विद्युत पुरवठा करणारा वीज वाहक रेल दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१६ रोजी निखळून रस्त्यावर पडल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) तसेच, सदरहू मोनोरेलच्या सुरक्षिततेबाबत कोणती खबरदारीची उपाययोजना शासनाकडून करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७)** :(१), (२), (३) व (४) सदर विज वाहक रेल (पॉवर कन्डक्टर रेल) हा रेल गाईडवे पासून अलग होवून पिअर कॅप वरती स्थिर झाल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र तो निखळून रस्त्यावर पडला हे खरे नाही. तथापि, घडलेल्या घटनेची चौकशी करण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून चौकशी समिती नेमण्यात आली असून सदर समितीच्या अहवालानुसार कारवाई करण्यात येत आहे. सदर मार्गावर प्रवासी वाहतूक सुरु करण्याआधी सुरक्षा अभियंत्याकडून तपासणी करुन घेऊन प्रवाशी वाहतुकीकरीता सुरक्षा प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच मोनोरेल टप्पा-२ चा मार्ग प्रवाशी वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे.

---

**मिठी नदी रुंदीकरण अंतर्गत बाधित झालेल्या झोपडपट्टींच्या स्थलांतरणाबाबत**

**(९) ६५७७७ (१६-०१-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला कलिना येथील मिठी नदी रुंदीकरण अंतर्गत किस्मतनगर, कपाडीयानगर येथील बाधित झालेल्या झोपडपट्टींच्या स्थलांतरणाची कार्यवाही सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यत किती बाधित झोपडपट्टयांचे स्थलांतरण करण्यात आले आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७)** :(१) व (२) कुर्ला (पश्चिम) येथील किस्मत नगर व नसीबुल्लाह कंपाऊंड येथील मिठी नदी रुंदीकरणांतर्गत बाधित झालेल्या झोपडपट्टीच्या स्थलांतरणाची प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु असून बाधित झोपडीधारकांची पात्र-अपात्रता निश्चित झालेली आहे.

कपाडिया नगर येथील बाधित झालेल्या एका बाजुच्या झोपडपट्टीचे स्थलांतरण झाले असून, दुसऱ्या बाजुच्या झोपडपट्टीच्या स्थलांतरणाची प्रक्रिया एमएमआरडीए मार्फत सुरु आहे.

(३) किस्मत नगर येथील मिठी नदी रुंदीकरणामध्ये बाधीत होणाऱ्या झोपड्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासनाच्या नोटीसा देण्यात आल्या होत्या.

सदर नोटीशींविरोधात व मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या दिनांक १९.०८.२००५ रोजीच्या शासन निर्णयाविरोधात मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक २५८६/२०१३ व ७१५/२०१५ दाखल झाल्या होत्या. सदर रिट याचिका दिनांक १७.०१.२०१७ रोजी निकाली निघाल्या आहेत.

तथापि, मिठी नदी रुंदीकरण प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या व्यक्तींनी/विश्वस्तांनी त्यांच्या खाजगी जागेबद्दल नुकसान भरपाई मिळण्याकरिता मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक १४७०/२०१२, २३९८/२०१३ व २३९६/२०१३ मध्ये मा. न्यायालयाने निष्कासनाविरुध्द स्थगिती आदेश दिले आहेत.

सदर प्रकरणे सध्या न्यायप्रविष्ठ आहेत.

---

**बोटक्लब, उल्हासनगर - ३. (जि.ठाणे) येथील सी.सी.टी.एस-१३०२२, शीट न.२८ ही जागा विकसित करण्याबाबतचा प्रस्ताव**

**(१०) ६६६२८ (१६-०१-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोटक्लब, उल्हासनगर - ३. (जि.ठाणे) येथील सी.सी.टी.एस-१३०२२, शीट न.२८ या जागेवरील ३० वर्षापूर्वीचा बोटिंग तलाव बंद पडून तेथे देखभाली अभावी अतिक्रमण होत असल्यामुळे उल्हासनगर महानगरपालिकेने तेथे बीओटी तत्वावर बोटक्लब विकसित करण्याचा प्रस्ताव (अहवाल) उल्हासनगर उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक उल्हासनगर शहर वसाहत यांच्याकडे दिनांक १६ मे, २०११ रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक उल्हासनगर शहर वसाहत यांच्या आदेशास अनुसरून उल्हासनगर महानगरपालिकेने उक्त जागेच्या मुल्यांकनाबाबत सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे यांना दिनांक २८ ऑक्टोबर २०१४ रोजी वा त्यासुमारास विनंती पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विनंती पत्राच्या अनुषंगाने वारंवार स्मरण पत्रे दिल्यावरही सहाय्यक संचालक, नगररचना ठाणे यांनी कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्नी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २३ जून, २०१६ रोजी पत्र देऊन अवगत केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त विषयी शासनस्तरावरून काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७) :**(१) सदर प्रस्ताव दिनांक ९ मे, २०११ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला आहे.

(२), (३), (४) व (५) हे खरे आहे.

बोटक्लब विकसित करण्यासाठी असलेली उल्हासनगर येथील सी.सी.टी.एस-१३०२२, शीट नं. २८ ही जागा शासनाच्या मालकीची असल्याने, बोटक्लब विकसित करण्याच्या अनुषंगाने जागेचे मुल्यांकन करुन मिळणेबाबतची पुढील कार्यवाही उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

---

**मुंबई महानगरपालिका क्षेत्रांतर्गत येणाऱ्या मालमत्तेच्या नोंदीबाबत**

**(११) ६६७८३ (१६-०१-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका हद्दीत येणाऱ्या मालमत्तेच्या नोंदी व शासनाकडील नोंदी यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तफावतीमुळे झोपडपट्टी पुनर्वसन यंत्रणा व कर वसुली यामध्ये प्रचंड प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार होऊन शासनाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७) :**(१), (२) व (३) मुंबई उपनगर जिल्ह्यातील जमिनींबाबत वारसाने तसेच नोंदणीकृत दस्ताने नोंदी मिळकत पत्रिकेवर घेण्यात येतात. बांधकामाबाबतच्या नोंदी मिळकत पत्रिकेवर घेण्यात येत नाहीत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रत्येक फ्लॅट / मिळकत या बांधकामाच्या नोंदी घेतल्या जातात. महानगरपालिकेमार्फत त्यांचे मिळकत नोंदवहीला, जी व्यक्ती त्याठिकाणी राहते त्यांची नावे घेतली जातात, ती महसुल अभिलेखाप्रमाणे असतील असे नाही. त्यामुळे नोंदीमध्ये तफावत असू शकते.

तथापि, मुंबई महानगरपालिका हद्दीत येणाऱ्या मालमत्तेच्या नोंदी व शासनाकडील नोंदी यातील तफावतीबाबत कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.

मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सन २०१६-१७ मध्ये ३,१७,०९७ इतक्या मालमत्तांमधील एकूण २९,९१,५५४ एकक (गाळे) करनिर्धारीत असून, त्यांची कर आकारणी करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील दहिसर-चारकोप-मानखुर्द या मेट्रो-२ प्रकल्पाची चुकीच्या पध्दतीने आखणी केल्याबाबत

**(१२) ६७८०७ (१६-०१-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दहिसर-चारकोप-मानखुर्द या मेट्रो-२ मार्गाची चुकीच्या पध्दतीने आखणी केल्यामुळे ४ कोटी ७१ लाखांचा खर्च व्यर्थ गेल्याचे कॅगच्या अहवालात नमूद केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) सवलदारामार्फत सदर प्रकल्पाबाबत प्राथमिक स्वरुपात करण्यात येणाऱ्या सर्वेक्षण, संरेखन, तपशीलवार रेखाचित्रे इत्यादी कामावर देखरेख करण्याकरिता निष्णात मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने सवलत करारनाम्यानुसार स्वतंत्र अभियंत्याची नेमणूक मुंबई मेट्रो रेल

कॉर्पोरेशन लि. व मुंबई मेट्रो टॉन्सपोर्ट प्रा.लि. यांच्यामध्ये करार करून नियुक्ती करण्यात आली होती. उक्त संदर्भात स्वतंत्र अभियंत्याने ऑक्टोबर २०११ ते जून २०१३ यादरम्यान पुरविलेल्या सेवेबदल्यात मानधन देणे हे सवलत करारनामा व स्वतंत्र अभियंत्याबरोबर झालेल्या करारानुसार बंधनकारक होते. या प्रकरणी मा. महालेखापाल यांनी उपस्थित केलेल्या लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने लोकलेखा समितीस स्पष्टीकरण सादर करण्यात आले आहे.

---

**राज्यातील महापालिकांनी अग्निसुरक्षेसाठी तरतूद केलेला निधी खर्च करण्याबाबत**

**(१३) ६९८५३ (१९-०१-२०१७). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २६ पैकी ८ महापालिकांनी (मुंबई, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर) अग्निसुरक्षा व्यवस्थेसाठी २०१०-१५ च्या अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या निधीपैकी फक्त २२% निधी खर्च केला असे भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या (CAG) विधिमंडळात मांडलेल्या अहवालात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकांनी अग्निसुरक्षा व्यवस्थेसाठी तरतूद केलेल्या निधीचा इतरत्र कुठे वापर केला आहे व त्याचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, महापालिकांनी अग्निसुरक्षेसाठी तरतूद केलेल्या निधीचा १००% खर्च करण्याबाबत व महापालिकांच्या अग्निशामक दलांचे वार्षिक लेखापरीक्षण नियमित होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१७) :**(१) होय

(२) व (३) महापालिकांनी अग्निसुरक्षा व्यवस्थेसाठी तरतूद केलेल्या निधीचा इतरत्र वापर केलेला नाही. अग्निशमन दलाच्या वापरासाठी खरेदी करावयाची वाहने व उपकरणे ही विशिष्ट प्रकारची असल्यामुळे ती त्वरीत उपलब्ध होत नाहीत. त्यांची मागणी अग्निशमन दलाच्या मागणी प्रमाणे करण्यात येते. त्यामुळे एका आर्थिक वर्षामध्ये या वाहनांची व उपकरणांची खरेदी शक्य होत नाही. त्यामुळे दरवर्षी काही निधी विनावापर पडून राहतो व पुढील वर्षामध्ये त्याकरीता तरतुद करण्यात येते. महानगरपालिकेचा लेखापरिक्षण विभाग दरवर्षी लेखापरिक्षण करुन अहवाल सादर करतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालाड - मढ (मुंबई) या मार्गातील गतिरोधकांची उंची कमी करण्याबाबत**

**(१४) ७३४५१ (२४-०१-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड - मढ (मुंबई) हा रस्ता सुमारे १४ किलोमीटर लांबीचा असून मढ - मार्वे या पर्यटनाच्या ठिकाणी ये-जा करणाऱ्या प्रवाशामुळे या रस्त्यावर नेहमीच रहदारी असते त्यामुळे या रस्त्यावरून वेगाने चालणाऱ्या वाहनांना पायबंध घालण्यासाठी रस्त्यावर ठिकठिकाणी उंच गतीरोधक बसविले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रोडवर ठिकठिकाणी (मोठे) गतिरोधक बसविले असल्याने वाहनाचा वेग कितीही कमी असला तरी वाहन गती रोधकवरुन जाताना आदळत असल्याने त्याचा त्रास गरोदर महिला व ज्येष्ठ नागरिक यांना होत असल्याने तेथील नागरिक त्रस्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परिसरातील असलेली मालवणी येथील महापालिकेची शाळा भरताना व सुटताना मोठी गर्दी होत असल्याने या रस्त्यावर गतिरोधक बसविणे गरजेचे असतांनाही या रस्त्यावर कोठेही गतिरोधक नसल्याने येथील नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मालाड-मढ या रस्त्यावरील गतिरोधकाची उंची कमी करण्याबाबत व शाळेसमोर गतिरोधक लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७)** :(१) हे खरे नाही.
मालाड-मढ रस्त्यावरील गतिरोधकांची उंची आय.आर.सी. च्या मानकानुसार ठेवण्यात आलेली होती. तथापि, काही गतिरोधकांचा उतार खचल्याचे तथा काळपरत्वे झिजल्याने काही गतिरोधकांची उंची जास्त भासत आहे.
(२) सदर प्रकरणी कोणतीही लेखी तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.
(३) व (४) मालवणी येथील महानगरपालिकेच्या शाळेजवळ मालाड-मार्वे रोडवर गतिरोधक स्थानिक लोकांच्या मागणीनुसार बसविण्यात आला आहे.
त्यामुळे सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.
(५) व (६) मालाड-मढ या मार्गाची पाहणी करुन सदोष गतिरोधक निश्चित करुन, त्यांची अनुषंगिक दुरुस्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

---

### मुंबई महानगरपालिकेने सुरु केलेली शौचालय योजना पूर्ण क्षमतेने राबविण्याबाबत

**(१५) ७३९०६ (२०-०४-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार**

**(कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने सुरु केलेली शौचालय योजना निधी असतानाही पूर्ण क्षमतेने राबविण्यात येत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना पूर्ण क्षमतेने राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या वस्ती स्वच्छता शौचालयाच्या कामाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रूपये १० कोटीची तरतूद करण्यात आलेली होती. त्यापैकी रूपये ९ कोटी ६८ लाख इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे. तसेच सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात रूपये ५ कोटीची तरतूद करण्यात आलेली असून माहे सप्टेंबर, २०१७ पर्यंत त्यापैकी रूपये १.५० कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभाग स्तरावर देखील शौचालयांची बांधकामे करण्यात येत असून, यासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात रूपये ७५ कोटीची तरतूद करण्यात आली असून त्यापैकी १४.८४ कोटी रूपये खर्च करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या तत्कालीन शिक्षण प्रमुखांनी १८ शिक्षकांच्या नियुक्तीला नियमबाह्य मान्यता दिल्याबाबत

**(१६) ७४१५५ (२०-०४-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या तत्कालीन शिक्षण प्रमुखांनी शिक्षक भरतीवर बंदी असतांना १८ शिक्षकांच्या नियुक्तीला वैयक्तिक नियमबाहय मान्यता दिल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात शिक्षण मंडळाच्या त्रिस्तरीय चौकशीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षकांना शासनाकडून नियमितपणे वेतन सुरु असून या प्रकरणी संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१७) :**(१), (२) व (३) होय हे खरे आहे. या प्रकरणी विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या स्तरावरुन चौकशी समिती नेमण्यात आली होती.

सदर प्रकरणी संबंधीत सर्व कर्मचाऱ्यांची चौकशी सुरु करण्यात येत आहे.

---

**नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत**

**(१७) ७४४५७ (२१-०४-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांच्या विद्यार्थ्यांचे विद्यावेतन बंद करू नये, बेलापूर किल्ल्याच्या संवर्धनासाठी ठोस कार्यवाही करावी, प्रकल्पग्रस्तांच्या शैक्षणिक संस्थांना देण्यात आलेल्या भूखंडाची मालकी संबंधित संस्थांना हस्तांतरित करावी, त्यांच्या संस्थेच्या शाळांना बाजूचा मोकळा भूखंड उपलब्ध करून द्यावा इत्यादी मागण्यांची पूर्तता लवकरात लवकर करण्यात यावी असे निवेदन मा. मुख्यमंत्री व व्यवस्थापकीय संचालक यांना माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्याच्या पूर्ततेबाबत शासनस्तरावरून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१७) :**(१), (२) होय.

नवी मुंबई प्रकल्पामध्ये समाविष्ट गावांतील प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना (जे.एन.पी.टी. भाग वगळता) शिक्षणासाठी मदत करण्यासाठी (इ. ११ वी ते पदव्युत्तर) विद्यावेतन योजना सन १९७२-१९७३ पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये ठाणे तालुक्यातील २९ गावे समाविष्ट असून सदर गावे ही नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये येत असून तेथील पायाभूत सुविधा विषयक बहुतांश बाबी, सिडकोकडून नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत. सदर भाग नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये असल्याने व हस्तांतरीत झाला असल्याने, सदर योजना पुढे चालू ठेवावी किंवा कसे याबाबतची बाब संचालक मंडळाच्या विचाराधीन आहे.

बेलापूर किल्ल्याचे जतन व संवर्धन करून या जागेचा एक पर्यटन स्थळ म्हणून विकास करणे यासाठीच्या रू. ११ कोटीच्या प्रस्तावाचा सिडकोच्या 'स्मार्ट सिटी प्रकल्पा' अंतर्गत समावेश केलेला आहे. सदर स्मार्ट सिटी प्रकल्पाला सिडको संचालक मंडळाच्या दिनांक ०१/१२/२०१५ च्या बैठकीमध्ये ठराव क्र. ११४९७ ला मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच, बेलापूर किल्ल्याचा पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्यासाठी मे.किमया, पुणे या संमत्रंकाची नेमणूक करण्यात आलेली आहे.

नवी मुंबई जमीन विल्हेवाट अधिनियम (सुधारीत), २००८ प्रकरण ४, विनियम क्र. ११(i) अन्वये महामंडळामार्फत नवी मुंबईतील भूखंडांचे वाटप ६० वर्षांच्या भाडेपट्टयाने करण्यात येते. नवी मुंबई येथे विविध संकुलामध्ये वेळोवेळी प्रचलित असलेल्या धोरणान्वये सर्वसाधारण नागरीकांनी व प्रकल्पग्रस्त नागरीकांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थांना शालेय भूखंडांचे वाटप करण्यात आलेले आहे. संचालक मंडळाचा ठराव क्र.११३७५ दि.२३.६.२०१५ च्या नवी मुंबई सुधारित भूमूल्य आकारणी आणि भूविनियोग, २०१५ धोरणान्वये आरेखित केलेले शाळेलगतचे शालेय क्रिडा उपक्रमासाठीचे भूखंड १५ वर्षांकरिता रु.१०,०००/- प्रती वर्ष नूतनीकरण करण्याच्या अटीवर भाडेकराराने वाटप करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहर व हद्दीतील विविध भागांमध्ये बसवलेल्या महापुरुष, व समाजसेवकांच्या पुतळ्यांची सुरक्षा आणि देखभाल होत नसल्याबाबत

**(१८) ७४७४६ (२०-०४-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर व हद्दीतील विविध भागांमध्ये बसवलेल्या महापुरुष व समाजसेवकांच्या पुतळ्यांची सुरक्षा आणि देखभाल होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील जवळजवळ ९० टक्के पुतळ्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून पुतळ्यांभोवती साचलेली धूळ, परिसरातील अस्वच्छता, सुरक्षारक्षकांचा अभाव यामुळे महानगरपालिका प्रशासनाला पुतळ्याच्या सुरक्षेविषयी गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली, तसेच पुतळ्यांची सुरक्षा-देखभालीबाबत शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१७) :**(१), (२) व (३) पुणे शहरातील पुतळयांच्या अवतीभोवती कायमची स्वच्छता ठेवण्यासाठी वेळोवेळी संबंधीत भागातील कर्मचाऱ्यांमार्फत स्वच्छता करण्यात येते. त्याशिवाय पुण्यतिथी व जयंती या दिवशी अग्निशमन विभागाकडून पुतळे स्वच्छ करण्यात येतात आणि आवश्यक वाटल्यास रंगरंगोटी केली जाते.

पुतळयांच्या ठिकाणी प्रकाश व्यवस्था करण्यात आली आहे. पुतळयांजवळ सुरक्षारक्षक व सी.सी.टिव्ही यंत्रणा कार्यान्वित ठेवणे अडचणीचे आहे तथापि अति दक्षता ठिकाणी सुरक्षारक्षक व सी.सी.टिव्ही यंत्रणा कार्यान्वित ठेवली आहे.

काही ठिकाणी भिकाऱ्यांचा वावर असून त्यांच्यावर कारवाई केली जाते त्यामुळे पुतळया भोवती असणारी अस्वच्छता व विविध गैरसोई होतात असे म्हणणे उचित नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उरण (जि. रायगड) या शहराला बाहयवळण रस्ता करण्याबाबत**

**(१९) ७५४०८ (१२-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि. रायगड) या शहराच्या बाहयवळण रस्त्याला महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटीने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, सदर रस्त्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१७) :**(१) उरण बायपास रस्त्याच्या कामाच्या प्रस्तावास महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांनी दि.२.११.२०१६ व ३.११.२०१६ रोजीच्या ११४ व्या बैठकीत सागरतटीय नियमन क्षेत्र (CRZ) नुसार सशर्त मंजूरी देऊन सदर प्रस्ताव स्टेट एन्व्हायरनमेंट इंपॅक्ट असेसमेंट अथॉरिटी (SEIAA) कडे शिफारस केली आहे.

(२) सदर रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीपैकी ३० टक्के जमीन सिडकोच्या ताब्यात असून उर्वरित ७० टक्के जमिन सिडकोकडे वर्ग करण्याकरिता जिल्हाधिकारी, रायगड यांना सिडकोकडून कळविण्यात आले आहे. सदर रस्ता सागरी किनारी क्षेत्र व कांदळवन बाधीत क्षेत्रातून जात असल्याने MCZMA, SEIAA, वन विभाग तसेच मा.उच्च न्यायालयाची परवानगी प्राप्त झाल्यानंतर १८ महिन्यांच्या कालावधीत सदर काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(३) सदर कामाचा अंदाजित खर्च रु.४० कोटी इतका असून सन २०१७-१८ या वर्षाच्या सिडकोच्या अंदाजपत्रकामध्ये यासाठी रु.१ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्रमुख शहरातील रेल्वेस्टेशन लगत महानगरपालिका हद्दीमधील अनधिकृत फेरीवाल्यांमुळे नागरिकांची होत असलेली गैरसोय**

**(२०) ७७५०८ (२१-०४-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रमुख शहरातील रेल्वेस्टेशन लगत महानगरपालिका हद्दीमधील अनधिकृत फेरीवाले दिवसेंदिवस वाढत असल्याने प्रवासी पादचारी नागरिक यांना सकाळी व सायंकाळी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे शहरात सी.सी.टी. व्ही. कॅमेरे, सुरक्षा रक्षकाची नेमणूक करूनही फेरीवाल्यांचा उपद्रव कमी झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी कोकण रेल्वे प्रवासी संघ व नागरीकांनी दिनांक १५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार करून याबाबत कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्थानिक प्रशासन कारवाई करीत नसल्याने या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७) :**(१) व (२) हे अंशतः खरे आहे.
(३) व (४) ठाणे रेल्वे स्टेशन परिसरातील फेरीवाल्यांसंदर्भात नागरिकांकडून वेळोवेळी तक्रार प्राप्त होत असतात हे खरे आहे.
(५) व (६) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सकाळ-संध्याकाळ सत्रात फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात येते. तसेच रेल्वेच्या सुरक्षा रक्षकांसमवेत स्टेशन परिसरातील फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात येते.

ठाणे महानगरपालिकेमार्फत उपायुक्त दर्जाचे अधिकारी यांचे अधिपत्याखाली विशेष भरारी पथक गठीत करुन ठाणे रेल्वे स्टेशन परिसरातील फेरीवाल्यांवर दैनंदिन कारवाई करण्यात येते.

---

**नवी मुंबईत स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी गरजेपोटी बांधलेले**
**२० हजार घरे नियमित करण्याबाबत**

**(२१) ७८८७४ (२१-०४-२०१७). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईत स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी गरजेपोटी बांधलेली २० हजार घरे अधिकृत करुन घेण्यासंदर्भात तसेच गावठाणापासून २०० मिटर हद्दीतील घरांना मान्यता देण्यासंदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडको व शासनाकडून अधिसूचना किंवा शासन निर्णय निर्गमित केला शासनाकडून निघाला नसल्याने सिडकोने बरीच घरे अनधिकृत ठरविली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतक-यांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१०-२०१७) :**(१), (२) व (३) नागरी पुनरुत्थान योजनेंतर्गत (क्लस्टर डेव्हलपमेंट) मूळ दाटीवाटीचे (गावठाण)/विस्तारीत दाटीवाटीचे (विस्तारीत गावठाण) क्षेत्राचा एकत्रितपणे पुनर्विकास अनुज्ञेय करण्याच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका तसेच सिडकोच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये स्वतंत्र विनियम अंतर्भूत करण्यासाठी महाराष्ट्र

प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१अेअे) अन्वये दि.४.३.२०१४ रोजी दोन स्वतंत्र सूचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. यामध्ये अनधिकृत बांधकामे विकासामध्ये सामावून घेण्याबाबतची तरतूद आहे. तथापि, जनहित याचिका क्र.६१/२०१४ मध्ये नागरी पुनरुत्थान योजनेंतर्गत आघात मूल्यमापन अहवाल तयार केल्याशिवाय अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यास मा.उच्च न्यायालयाने प्रतिबंधात्मक आदेश दिल्यामुळे अंतिम अधिसूचना निर्गमित करता आलेली नव्हती. आता, याबाबतची पूर्तता झाल्याने मा.उच्च न्यायालयाने दि.९.६.२०१७ रोजी सदर जनहित याचिका निकाली काढलेली असल्याने अंतिम अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील अनधिकृत बांधकामावर आळा घालणे व नियमितीकरणाबाबतच्या धोरणाला मंत्रिमंडळ तसेच विधीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५२ व ५३ मध्ये सुधारणा करण्यात आली असून दि.१५.४.२०१७ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली नियमावली हरकती/सूचनांसाठी दि.२१.७.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव (जि.जळगांव) शहराच्या मध्यभागी वाहणा-या तितूर व डोंगरी नदीपात्रात कचरा साचल्याने झालेले प्रदूषण**

**(२२) ८४१२९ (२०-०४-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगांव) शहराच्या मध्यभागी वाहणा-या तितूर व डोंगरी नदीपात्रात मोठया प्रमाणात कचरा साचून राहिल्याने उक्त नद्यांना नाल्याचे स्वरुप प्राप्त झाले असल्याने परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकडे नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त नदीपात्र स्वच्छतेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७)** :(१) होय, सदर नदीपात्रात मोठया प्रमाणात कचरा साचलेला होता, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) नगरपालिकेने लोक सहभागातून नदीपात्र स्वच्छ केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने लोकप्रतिनिधींच्या रुग्णांना व्हीआयपी ट्रीटमेंट देण्याचे महानगरपालिकेच्या रुग्णालयांना आदेश देणारे परिपत्रक काढल्याबाबत**

**(२३) ८५१६९ (२३-०८-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने लोकप्रतिनिधींच्या रुग्णांना व्हीआयपी ट्रीटमेंट देण्याचे महानगरपालिकेच्या रुग्णालयांना आदेश देणारे परिपत्रक काढले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील निर्णयामुळे खासगी रुग्णालयांचा खर्च न परवडणारे गोरगरीब महानगरपालिका रुग्णालयात मोठया प्रमाणात येत असल्याने त्यांच्या रुग्णसेवेवर परिणाम होणार असल्याने सर्वसामान्य रुग्णांमध्ये नाराजी पसरली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर परिपत्रक मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच गोरगरीब रुग्णांना प्राधन्याने रुग्णसेवा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर परिपत्रक बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मागे घेण्यात आले असून, महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये उपचारांकरिता येणाऱ्या रुग्णांना त्यांच्या आजारानुसार व आवश्यकतेनुसार वैद्यकीय उपचार करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई महानगरपालिकेचे जाहिरात व फेरीवाला धोरण शासनाकडे मंजुरीकरिता प्रलंबित असल्याबाबत**

**(२४) ८५२५३ (२३-०८-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेचे जाहिरात व फेरीवाला धोरण शासनाकडे मंजुरीकरिता प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणास शासनाची मंजुरी प्राप्त झाली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१७)** :(१) व (२) दि.२१ जून, २०१४ रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश चिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०१४ प्रारुप तयार केलेले असून, सदर जाहिरात नियम अंतिमिकरणाबाबतची कार्यवाही सुरु आहे.

केंद्र शासनाच्या पदपथावरील विक्रेते (उपजिविका संरक्षण व पदपथावरील विक्री विनियम) अधिनियम २०१४ मधील कलम ३६(१) नुसार शासनाने दि.०३ ऑगस्ट, २०१६ अन्वये पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१७, तसेच उक्त अधिनियमातील कलम ३८(१) नुसार दि.०९ जानेवारी, २०१७ रोजी पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन (महाराष्ट्र) योजना, २०१७ मंजूर केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे महानगरपालिकेच्या बालवाडी शिक्षिका व मदतनिसांचे पाच महिन्यापासून वेतन थकीत असल्याबाबत**

**(२५) ८५५५९ (२३-०८-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे महानगरपालिकेच्या बालवाडी शिक्षिका व मदतनिसांचे पाच महिन्यापासून वेतन व वेतनातील फरक थकीत असल्याचे माहे एप्रिल,२०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेकडून बालवाडया बंद करण्यात येत असून त्यामुळे या शिक्षकांवर व मदतनिसांवर बेरोजगारीची वेळ येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालवाडया बंद करु नयेत व थकीत वेतन व फरक देण्यात यावे असे निवेदन दामिनी बालवाडी मदतनीस संघटनेतर्फे आयुक्तांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निवेदनाची दखल घेऊन शासनाने बालवाडया बंद न करणे व या बालवाडी कर्मचा-यांचे थकीत वेतन व वेतनातील फरक देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७)** :(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) महानगरपालिकेच्या ५१ बालवाड्यांपैकी प्रत्यक्ष पाहणीत १० व त्यापेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या बालवाड्या बंद करण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

तसेच आर्थिक तरतुदीला अनुसरुन बालवाडी कर्मचाऱ्यांचे मागील ०४ महिन्यांचे मानधन महानगरपालिकेमार्फत अदा करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरात विविध सेवा पुरविण्यासाठी रस्ते खोदाई करण्यात येत असल्याबाबत

**(२६) ८६३०६ (२३-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात विविध सेवा पुरविण्यासाठी खोदाई केलेले रस्ते पूर्ववत करण्याचे कामाची मुदत दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास संपली असताना अद्याप शंभर किलोमीटर लांबीचे रस्ते खोदलेले असून बहुतांश ठिकाणी मान्यता नसताना खोदाई सुरु असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे खोदलेल्या रस्त्यांचा राडारोडा, माती, डांबर रस्त्यावर अस्ताव्यस्त पडल्याने पावसाळ्यात धोका संभवतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे एप्रिल, २०१७ नंतर रस्ते खोदाईला मान्यता देण्यात आली नसल्याचा दावा महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आला असला तरी शहराच्या काही भागात रस्ते खोदाई सुरूच असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात पुणेकरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि बेकायदा खोदाई करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१७) :**(१) व (२) महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. कंपनी, महाराष्ट्र राज्य वीज वितरण महामंडळ व पुणे स्मार्ट सिटी डेव्हलमेंट कार्पोरेशन यांना दि. ३१/०५/२०१७ अखेर सेवा वाहिन्या टाकण्यासाठी रस्ते खोदाई कामास रितसर मुदतवाढ देण्यात आलेली होती. दि.३१/०५/२०१७ पर्यंत सेवा वाहिन्या टाकण्यासाठी देण्यात आलेल्या परवानगीच्या अनुषंगाने रस्ते खोदाई झालेल्या सर्व कामांचे रिईन्स्टेटमेंटची कामे, राडारोडा उचलणेची कार्यवाही दि. १०/०६/२०१७ पर्यंत (पावसाळा सुरु होण्यापुर्वी) पुर्ण करण्यात आलेली आहेत. तदनंतर आतापर्यंत सेवा वाहिन्या टाकणाऱ्या कंपन्यांकडून कोणत्याही रस्त्यावर खोदाई करण्यात आलेली नाही.

(३) महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. कंपनी, महाराष्ट्र राज्य वीज वितरण महामंडळ व पुणे स्मार्ट सिटी डेव्हलमेंट कार्पोरेशन यांना दि. ३१/०५/२०१७ अखेर सेवा वाहिन्या टाकण्यासाठी रस्ते खोदाई कामास रितसर मुदतवाढ देण्यात आलेली होती. तथापी पुणे महानगरपालिकेतर्फे सुरु असलेल्या विकास कामांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कंपन्यांची रस्ते खोदाईची कामे सुरु नाहीत.

(४) परवानगी न घेता रस्ते खोदाईची कामे केल्यास रितसर दंडात्मक कारवाई व पोलीस तक्रार दाखल करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमनुरी (जि.हिंगोली) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातंर्गत बांधण्यात येणाऱ्या नवीन पाण्याच्या टाकीचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(२७) ८६५५१ (२३-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातंर्गत बांधण्यात येणाऱ्या नवीन पाण्याच्या टाकीचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे तेथील ग्रामस्थांनी दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी केली आहे काय तद्नुसार सदरहू टाकीच्या कामाचा दर्जा सुधारण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१७) :**(१) शेख अय्युब शेख खलील, कळमनुरी जि.हिंगोली यांनी अशा आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी, हिंगोली यांना दिले आहे, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनात नमूद तक्रारीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, परभणी यांच्यामार्फत दिनांक १५ जून, २०१७ रोजी चौकशी करण्यात आली.

चौकशी अहवालानुसार प्रत्यक्ष घेण्यात आलेल्या चाचण्यांचे निष्कर्ष व कामाची भौतिक पाहणी करुन झालेल्या कामाचा दर्जा चांगला असल्याचे आढळले असल्याचे जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) कार्यक्षेत्रात तब्बल १ हजाराहून अधिक इमारती धोकादायक असल्याबाबत**

**(२८) ८६८८९ (२३-०८-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) कार्यक्षेत्रात तब्बल १ हजाराहून अधिक इमारती धोकादायक असून यातील ४०० इमारती कोणत्याही क्षणी कोसळतील अशा स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोकादायक इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१७)** :(१) व (२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रातील सन २०१७-१८ या वर्षात एकूण ५३१ इमारती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६४ मधील तरतूदीनुसार धोकादायक म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत.

या धोकादायक इमारतींची माहिती नागरिकांच्या माहितीकरीता महानगरपालिकेमार्फत दि.०५/०६/२०१७ रोजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच धोकादायक इमारतींमधील निवासी/वाणिज्य वापर बंद करण्याबाबत नागरिकांना जाहिर आवाहन देखील करण्यात आले आहे. सदर इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्यासाठी एकूण ११ स्ट्रक्चरल अभियंत्यांची महानगरपालिकेच्या पॅनेलवर नियुक्ती करण्यात आलेली आहे. धोकादायक व अतिधोकादायक इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेऊन विहित केलेल्या S.O.P. नुसार सदरहू इमारतींवर कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुदखेड शहर व तालुक्यात (जि.नांदेड) सुसज्ज अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित होण्याबाबत**

**(२९) ८७३१२ (२३-०८-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुदखेड शहर व तालुक्यात (जि.नांदेड) नैसर्गिक आपत्ती किंवा अचानक आग लागल्यास ती शमविण्यासाठीची सुसज्ज यंत्रणा कार्यान्वित होण्यासाठी वर्षानुवर्षे प्रतिक्षाच करावी लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत शहरासाठी अग्निशमन यंत्रणेचे कार्यालयाचे बांधकाम सुरु असून कर्मचा-यांना ८ पदांना शासनस्तरावरुन मंजूरी प्राप्त असून शासनामार्फत अद्यापपर्यंत प्रस्तुत ठिकाणी सदर पदे भरलीच नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७)** :(१) या आशयाचे वृत्त स्थानिक वृत्तपत्रात दिनांक १८ एप्रिल २०१७ रोजी प्रसिध्द झाले आहे.

(२) हे खरे आहे, मुदखेड नगरपरिषदेकडून पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

(३) महाराष्ट्र केंद्र व अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत मुदखेड नगरपरिषदेकरीता १ अग्निशमन केंद्र व १ अग्निशमन वाहन मंजूर आहे. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे मार्फत सविस्तर प्रकल्प अहवालासह (DPR) प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत मुदखेड, नगरपरिषदेकडून कार्यवाही सुरु आहे.

अग्निशमन वाहन उपलब्धतेबरोबरच पद भरती संदर्भात उचित कार्यवाही करण्यात येईल असे मुदखेड नगरपरिषदेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हदगाव शहरात (जि.नांदेड) शुध्द पाण्याच्या नावाखाली पाणीविक्री करण्यात येत असल्याबाबत**

**(३०) ८७६१८ (२३-०८-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हदगाव शहरात (जि.नांदेड) शुध्द पाण्याच्या नावाखाली फिल्टर केलेले पाणी असे सांगून लाखो लिटर पाणीविक्री करण्याचा व्यवसाय वॉटरप्लांट व्यावसायिकांनी सुरु केला असून पाण्याच्या शुध्दतेबाबत पालिका प्रशासनाकडून कोणतीच परवानगी घेतली नसल्याचे दिनांक २१ एप्रिल,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शुध्द पाण्याच्या नावाखाली पाणीविक्रीचा व्यवसाय करणाऱ्यांवर आजपर्यंत कोणतीच कार्यवाही होत नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती शुध्द पाण्याच्या नावाखाली पाण्याचा व्यवसाय करणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१७)** :(१) हदगाव नगरपरिषदेतंर्गत दोन ठिकाणी नगरपरिषदेच्या परवानगी विना वॉटर प्लँट सुरु असल्याचे आढळून आले.
(२) व (३) विना परवानगी वॉटर प्लँटला दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी नगरपरिषदेने नोटीस दिली. सदर नोटीसला कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याने नगरपरिषदेने सदर वॉटर प्लँट दिनांक १९ जुलै, २०१७ रोजी सिल केलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या ई-वॉर्डातील बीआयटी चाळींच्या विविध दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३१) ८८०६५ (२३-०८-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या ई-वॉर्डातील बीआयटी चाळींच्या विविध दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याचा आरोप स्थायी समितीच्या बैठकीत केला गेला व या गैरव्यवहाराची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्याची मागणी करण्यात आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत काय, त्यानुसार चौकशीचे निष्कर्ष काय व चौकशीनुसार संबंधित दोषी अधिका-यांवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७) :**(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक २६.०५.२०१७ रोजीच्या स्थायी समितीच्या सभेत “ई” विभागातील ताडवाडी येथील बी.आय.टी. चाळींच्या दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याचा आरोप महापालिका सभागृह नेते यांनी केला आहे.
(२) सदर बी.आय.टी. चाळींवर किरकोळ दुरुस्तीची कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजुरीने पूर्ण करण्यात आली आहेत. तसेच, सदर दुरुस्तीच्या कामाची तपासणी दक्षता विभागामार्फत करण्यात आलेली आहे.
त्यामुळे सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) परिक्षेत्रातील नागरिकांच्या दैनंदिन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याबाबत

**(३२) ८८२७५ (२३-०८-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) परिक्षेत्रातील नागरिकांच्या दैनंदिन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या उद्देशाने संबंधित महानगरपालिका प्रशासनाने अनुक्रमे उल्हास व काळू नदीपात्रातून तसेच आसपासच्या गावांशी जोडणाऱ्या औद्योगिक वसाहतीतून स्थानिय नागरिकांना व शहरी भागातील भोगवटादरांना त्यांच्या दैनंदिन पेय जलाची समस्या व सांडपाणी समस्या सोडविण्यासाठी उक्त नदीपात्रातून प्रतिदिन ३१० दशलक्ष घन लिटर आणि चार दशलक्ष घन लिटर पाणी उचलण्याची परवानगी देण्याची मागणी स्थानिय सर्वसामान्य नागरिक व जनप्रतिनिधी, नागरी संघटना यांनी मा.मुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री (नगरविकास), मंत्री (जलसंधारण), मुख्य-सचिव, अतिरिक्त मुख्य-सचिव (नगरविकास), सचिव (जलसंधारण), महापालिका आयुक्त व आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगर क्षेत्रविकास प्राधिकरण तसेच त्यांच्या अधिनस्त नागरी सेवांचे प्राधिकारी यांच्याकडे केल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बाबतीत संबंधित प्राधिकाऱ्यांकडून उक्त बाबींवरील समस्यांच्या निराकरणाबाबत कठोर उपाययोजना गठीत करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्याचे प्रस्तावित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१७)** :(१) हे खरे आहे.

(२) याबाबत संबंधित लघु पाटबंधारे विभागाकडे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरात १२ डायलीसिस केंद्रे सुरु करण्याबाबत

**(३३) ८८५४५ (२३-०८-२०१७). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात मूत्रपिंड निकामी झालेल्या रूग्णांना डायलिसीस उपचार त्वरित मिळण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने विविध ठिकाणी डायलिसीसची १२ केंद्रे सुरु करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या केंद्राद्वारे १९९ डायलिसीस यंत्राच्या सहाय्याने ३५०/- रुपयांहून कमी शुल्कात रूग्णांना सेवा मिळणार असून निवड झालेल्या संस्थांवर डायलिसीस यंत्र बसविणे व त्याची देखभाल दुरुस्ती, मनुष्यबळ यांची व्यवस्था करणे बंधनकारक केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त डायलिसिस केंद्रे किती कालावधीत कार्यान्वयित करण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७)** :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सार्वजनिक-खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरणांतर्गत ३ संस्थांमध्ये डायलिसिस केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

तसेच, ८ ठिकाणी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन स्वतंत्र डायलिसिस केंद्रे सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे आणि २ ठिकाणी डायलिसिस केंद्रे सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

---

## पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील शासकीय व निमशासकीय कार्यालयाकडे थकीत असलेल्या मालमत्तावर जप्तीची कार्यवाही करण्याबाबत

**(३४) ८८६४९ (२३-०८-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नगरविकास विभागाने राज्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयाकडे मागील पाच वर्षांपासून थकीत असलेल्या मालमत्तावर जप्तीची कार्यवाही करण्याचे आदेश स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील शासकीय व निमशासकीय कार्यालयांकडे एक कोटी रुपये मालमत्ता कर थकीत आहे मात्र मुख्याधिकाऱ्यांकडून शासकीय कार्यालयावर कारवाई करण्यास टाळाटाळ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अद्यापही कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१७) :**(१) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम-१९६५ चे कलम १५२ अन्वये थकीत मालमत्ता कर वसुली करीता जप्तीची कार्यवाही करण्याचे अधिकार नगरपरिषदेला आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

पांढरकवडा नगर परिषद क्षेत्रातील शासकीय व निमशासकीय कार्यालयाकडील रु.३४४५७३०/- थकीत मालमत्ता करापैकी सन २०१६-१७ मध्ये रु.१५५३१६६/- मालमत्ता कर वसुली करण्यात आली आहे उर्वरीत रु.१८९२५६४/- इतका थकीत मालमत्ता कर भरणा करण्याबाबत पांढरकवडा नगरपरिषदेकडून पाठपुरावा सुरू आहे. यासंदर्भात संबंधित कार्यालयांनी शासनाकडून निधी प्राप्त होताच कर भरणेची हमी दिल्यामुळे संबंधीत कार्यालयास मुदत देण्यात आली आहे.

---

**हुपरी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील आरक्षित झालेले भूखंडच नसल्याबाबत**

**(३५) ८८७४९ (२३-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हुपरी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील ब-याच भागात आरक्षित केलेले भूखंडच नाहीत किंवा भूखंड आरक्षित करण्यात आले नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांसाठी बागबगिचे, सांस्कृतिक हॉल, विरंगुळा केंद्र, बालकांसाठी खेळ, व्यायाम शाळा आदि सुविधा करण्याकरिता आरक्षित करण्यात आलेले भूखंड बळकविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१७) :**(१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

हुपरी नगरपरिषद दिनांक ११.०४.२०१७ रोजी अस्तित्वात आली असून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन अधिनियम, १९६६ अन्वये सदर नगरपरिषद क्षेत्राची विकास योजना अद्याप तयार करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर क्षेत्रामध्ये नागरीकांच्या सुविधांसाठी जागा सद्य:स्थितीत आरक्षित करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे आरक्षित भूखंड बळकाविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजे रघुजीबाबा स्मारक (जि.नाशिक) या ठिकाणी येणाऱ्या पर्यटक व यात्रेकरूंना पुरेशा नागरी व मुलभूत सोई सुविधा उपलब्ध करण्याबाबत**

**(३६) ८९२१५ (२३-०८-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला नगरपरिषद क्षेत्रातील (जि.नाशिक) राजे रघुजीबाबा स्मारक या ठिकाणी येणाऱ्या पर्यटक व यात्रेकरूंना पुरेशा नागरी व मुलभूत सोई सुविधा उपलब्ध करण्यासाठी निधी मिळण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) येवला नगर परिषद स्तरावर प्रस्ताव तयार करण्यात येत असल्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या कार्यालयाने अहवाल सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे - भिवंडी - कल्याण दरम्यानच्या मेट्रोमार्ग - ५ प्रकल्पाच्या कामाबाबत**

**(३७) ८९९९२ (२३-०८-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे - भिवंडी - कल्याण दरम्यानच्या मेट्रोमार्ग-५ प्रकल्पाच्या कामाला शासनाने दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मेट्रो मार्गाच्या बांधकामास अद्यापही सुरवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामास केव्हा सुरुवात होणार आहे व सदर काम विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :**(१), (२), (३) व (४) सदर प्रस्तावास दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ च्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यता दिली आहे. सदर मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबाजावणीच्या मान्यतेसाठीचा प्रस्ताव शासनास सादर केला असून त्यास मंत्रीमंडळाची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्रातील २७ गावांमधील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत**

**(३८) ८९९९६ (२३-०८-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांमध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी डोंबिवली औद्यागिक निवासी विभागात सोनारपाडा रस्त्यालगत मोकळ्या भूखंडावर महानगरपालिकेकडून अनधिकृतरित्या कचऱ्याची विल्हेवाट लावली जात असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत डोंबिवली निवासी विभागातील नागरिकांनी सदर कचऱ्याची विल्हेवाट लावण्यास तीव्र विरोध करून प्रदूषण होत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सोनारपाडा येथे कचरा न टाकण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

सोनारपाडा रस्त्यालगत औद्योगिक निवासात १०/ई प्रभागक्षेत्रात समाविष्ट असलेल्या १७ गावांमधील कचरा घंटागाडीद्वारे संकलन करुन जमा केला जातो. जमा करण्यात आलेला कचरा डंपर्सद्वारे आधारवाडी क्षेपणभूमीवर दररोज नेवून टाकण्यात येत असल्यामुळे प्रदूषण होत नाही.

(३) सोनारपाडा या ठिकाणी कचरा कायमस्वरुपी टाकण्यात येत नाही. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील कचऱ्याच्या विल्हेवाटीबाबत शासनाने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत रु.११४ कोटीच्या प्रकल्प अहवालास मान्यता दिलेली असून त्याअंतर्गत ३ ठिकाणी शास्त्रोक्त भरावभुमी मंजूर असून अभिकर्त्याची नेमणूक केली आहे. सदरचे काम माहे मे, २०१८ पर्यंत पुर्ण होण्याची शक्यता आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका हद्दीतील वागळे इस्टेट, सम्राट नगर मधील रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित झालेल्या कुटुंबियांची कायमस्वरुपी राहण्याची व्यवस्था करण्याबाबत**

**(३९) ९०००२ (२३-०८-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील वागळे इस्टेट सम्राट नगर मधील रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित झालेल्या ४३ कुटुंबियांना मानपाडा येथे रेंटल हौसिंग योजनेमध्ये केवळ २१ घरे देण्यात आल्याचे दिनांक ०८ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मानपाडा येथील रेंटल हौसिंग योजनेमध्ये एकाच घरामध्ये दोन कुटुंब वास्तव्य करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एक वर्ष पूर्ण होऊनही महानगरपालिकेने सदर कुटुंबियांची राहण्याची कोणतीही कायमस्वरूपी व्यवस्था केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बाधित असलेल्या कुटुंबियांची कायमस्वरूपी राहण्याची व्यवस्था करण्याबाबत महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१७) :**(१) व (२) सदर बाधीत रस्तारुंदीकरणातील नसून तेथील नालापात्रातील अतिक्रमित कुटुंबे आहेत. सदर ५६ अतिक्रमित कुटुंबांपैकी प्रथमता संक्रमण शिबिरातील/रेंन्टल इमारतीतील उपलब्ध असलेल्या ३५ व तद्नंतर उर्वरित २१ कुटुंबियांना प्रत्येकी १ सदनिका देऊन तात्पुरते पुनर्वसन करण्यात आले आहे.
(३) व (४) ठाणे महानगरपालिकेमार्फत विकास आराखड्यामधील नियोजित रस्त्याने बाधित व आरक्षणाने बाधीत असलेल्या कुटुंबियांचे कायमस्वरूपी पुनर्वसन BSUP/PAP प्रकल्पामधील उपलब्ध सदनिकेमध्ये टप्प्याटप्प्याने करण्यात येते.

नाला रुंदीकरणामध्ये अतिक्रमितांचे अथवा नाला पात्रामध्ये वसलेल्या अतिक्रमितांचे कायमस्वरुपी पुनर्वसन ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्याचे धोरण सध्या अस्तित्वात नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत मंडया, दुकाने, फेरीवाल्यांकडून ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याबाबत

**(४०) ९०१४५ (२३-०८-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत मंडया, दुकाने, फेरीवाल्यांकडून ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असून महानगरपालिकांकडून कमी प्रमाणात कारवाई होत असल्याची बाब माहे एप्रिल-२०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्यांच्या वापरामुळे पर्यावरणावर मोठया प्रमाणात परिणाम होत असल्याने ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचा वापरावर रोख लावण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७) :**(१) ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या व ८ X १२ इंचापेक्षा कमी आकाराच्या प्लास्टीक पिशव्यांची विक्री करणाऱ्या दुकानांवर माहे जानेवारी २०१७ ते जून २०१७ या कालावधीत २८६ व्यक्तींवर महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाईदरम्यान त्यांचेकडून २०४.५७० कि.ग्रॅ. प्लास्टीक पिशव्या जप्त करण्यात आल्या असून रु. १४,२५,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(२) व (३) ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी असून या पिशव्यांच्या वापरावर रोख लावण्यासाठी, केंद्रीय प्रदुषण नियंत्रण बोर्डाच्या पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ तसेच महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम, २००६ मधील तरतुदींनुसार महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

---

**औरंगाबाद महानगरपालिकेतील दलित वस्ती सुधार योजनेतील गैरव्यवहार**

**(४१) ९०५०६ (२३-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेला दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत १४ कोटी रूपायांचा निधी उपलब्ध झाला आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत २२६ वेगवेगळी विकास कामे करण्यात येणार आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, मर्जीतील ठेकेदाराला कामे मिळण्यासाठी ही कामे ई-टेंडर वर प्रकाशित होऊन काही वेळातच ई-टेंडर गायब झाले, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय ,त्यात काय आढळून आले व त्यानुसार सबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१७) :**(१) व (२) औरंगाबाद महानगरपालिकेला दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन २०१६-१७ मध्ये १५.०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या योजनेअंतर्गत ६८ वेगवेगळी विकास कामे करण्यात येणार आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील कचऱ्याचे ऑडिट झाले नसल्याबाबत**

**(४२) ९०५७७ (२३-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत प्रत्यक्षात किती कचरा आहे, कोणत्या वार्डात किती मजूर काम करतात या बाबतचा दैनंदिन अहवाल तयार करून त्याचे ऑडिट करण्यात येते परंतु महानगरपालिकेने मागील २० वर्षांपासून ऑडिट केले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१७)** :(१) हे खरे नाही.

औरंगाबाद शहरातील सर्व ९ झोन मध्ये घरोघरी जाऊन कर्मचाऱ्यांमार्फत कचरा गोळा केला जात असून, संकलित केलेला कचरा मोठया वाहनांमार्फत नारेगांव कचरा डेपोमध्ये नेण्यात येतो. सदर कचरा वाहतुकीचा दैनंदिन अहवाल हा नारेगांव कचरा डेपोमध्ये नियुक्त केलेल्या स्वच्छता निरिक्षका मार्फत प्राप्त केला जातो.

जानेवारी, २०१६ पासून कच-याचे वर्गीकरण करण्यात येत असून त्यामुळे नारेगांव येथे जाणा-या कचरा वाहतूक वाहनांच्या फेऱ्यांवर व्हिडीयो कॅमेराव्दारे नियंत्रण ठेवण्यात येते. सुकाकचरा हा सेंट्रल नाका शेड्सला पाठवून त्यावर प्रक्रिया करण्यासाठी तो बाहेर पाठविण्यात येतो. तसेच काही निवडक प्रभागांमध्ये कंपोस्टिंग व्दारे दैनंदिन जमा होणा-या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येवून खत निर्मिती केली जाते असे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविलेले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील (जि.ठाणे) रूग्णालयात आरोग्य सुविधांची कमतरता असल्याबाबत**

**(४३) ९०५८१ (२३-०८-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील (जि.ठाणे) रूग्णालयात आरोग्य सुविधांची कमतरता निर्माण झाली असता महानगरपालिका रूग्णालय व्यवस्थापनावर करोडो रूपये खर्च करीत असल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिका आरोग्य विभागाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१७)** :(१) हे खरे नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या दोन्ही रुग्णालयात कार्यरत ४६ वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना विविध आरोग्य विषयक सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात.

सदर दोन्ही रुग्णालयांच्या व्यवस्थापनावर महानगरपालिका आवश्यक व अनुज्ञेय खर्च करीत असल्याने व्यवस्थापनावर करोडो रुपये खर्च करीत असल्याची बाब खरी नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरखेड नगरपरिषदेच्या (जि.यवतमाळ) घनकचरा संकलन केंद्रात आग लावल्यामुळे २०० झाडे जळाल्याबाबत**

**(४४) ९०९४८ (२३-०८-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड नगरपरिषदेच्या (जि.यवतमाळ) घनकचरा संकलन केंद्रात कचरा जाळण्यासाठी अत्यंत बेजबाबदारपणाने आग लावल्यामुळे हिंदू स्मशानभूमीतील जवळपास २०० झाडे जळाल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घनकचरा संकलन केंद्राचे व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांवर नगरपरिषद उमरखेड प्रशासनाने निलंबनाची कारवाई केली आहे काय,
(३) असल्यास, आग लागलेल्या घटनास्थळी नगरपरिषदेचा एकही जवाबदार अधिकारी उपस्थित नव्हता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंवदुंबर वृक्ष संवर्धन समितीने सदर प्रकरणाच्या संदर्भाने तक्रार प्रशासनाकडे केली आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, ग्रामविकास खात्याने सदर प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.
घनकचरा संकलन केंद्रावर आग लावण्यात आली नसून अचानक आग लागल्याचे आढळून आले. त्यात १५ ते २० रोपे जळाली आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) सदर घटनेची सूचना नगरपरिषदेला मिळताच तात्काळ अग्निशमन दल, संबंधित कर्मचारी, मुख्याधिकारी, नगरपरिषद अध्यक्ष व इतर कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होऊन आगीवर नियंत्रण ठेवण्यात आले आहे.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर) येथे पिण्याच्या पाण्यासाठी पालेश्वर धरणातून थेट पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(४५) ९२०६९ (२३-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथे पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिण्याच्या पाण्यासाठी पालेश्वर धरणातून थेट पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा योजनेसाठी नगरपालिकेने २ कोटी २१ लाख रुपयांचा प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावानुसार मुख्य अभियंता, पुणे यांनी या कामास तांत्रिक मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पाणी पुरवठा योजनेचे काम सुरु होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :**(१) मलकापूर शहरास कडवी नदीमधून जॅकवेलव्दारे सद्यस्थितीत पाणीपुरवठा करण्यात येत असून दरवर्षी उन्हाळयात जानेवारी ते १५ जून पर्यंत पाणीटंचाई निर्माण होत असल्याचे मलकापूर नगरपरिषदेने कळविले आहे.

(२), (३), (४) व (५) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या स्थायी आदेशानुसार प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेऊन नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर करणे आवश्यक आहे.

• त्यानुसार मलकापूर नगरपरिषदेने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत पालेश्वर धरणातून थेट पाईपलाईनव्दारे रु.२.०२ कोटीच्या पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेऊन शासनाकडे सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**नांदगांव नगरपरिषद हद्दीत (जि.नाशिक) नगरपरिषदेच्या मालकीची जागा कब्रस्तान म्हणून वापरण्यास मिळण्याबाबत**

**(४६) ९२४२९ (२३-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव नगरपरिषद हद्दीत (जि.नाशिक) मुस्लीम समाजासाठी सद्य:स्थितीत कब्रस्तान म्हणून वापरण्यात येत असलेली जागा वाढत्या लोकसंख्येमुळे अपुरी पडत असून त्यामुळे पूर्वी दफन केलेल्या प्रेतांची हेळसांड होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदगांव नगरपरिषद हद्दीत नगरपरिषदेच्या मालकीची सर्व्हे नंबर १६५/१ पैकी २ एकर जागा कब्रस्तान म्हणून वापरण्यास व विकास करण्यास मंजुरी मिळण्याबाबत प्रस्ताव नगरपरिषद नांदगांवने जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या कार्यालयाकडे दिनांक ५ डिसेंबर,२०१५ रोजी व त्या सुमारास सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७)** :(१) नांदगाव नगरपरिषद हद्दीतील कब्रस्तान वाढत्या लोकसंख्येमुळे अपुरे पडते, हे खरे आहे.
(२) नांदगाव नगरपरिषदेने सर्व्हे नंबर १६५/१ येथील जागा कब्रस्तान वापरासाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव दिनांक १५ मार्च, २०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकरी, नाशिक कार्यालयास सादर केला आहे.
(३) सदर जागेचे सीमांकन व हद्द कायम करण्यासाठी मोजणीची कार्यवाही उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयामार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्रातील एस.टी.स्थानक परिसर, रेल्वे स्थानक परिसर व स्कायवॉकवर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केले असल्याबाबत**

**(४७) ९२७७२ (२३-०८-२०१७). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्रातील एस.टी.स्थानक परिसर, रेल्वे स्थानक परिसर व स्कायवॉकवर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केले असून नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्कायवॉकवर गर्दुल्यांचा वावर असल्याने तेथून महिलांना जीव मुठीत धरून जावे लागते, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागरिकांनी वारंवार तक्रार देऊनही प्रशासनाकडून कोणतीही कारवाई केली जात नाही, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१७)** :(१) व (२) अंशतः हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी रेल्वे स्टेशन परिसरातील फेरीवाले व कायदा सुव्यवस्था यांचे नियोजन कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, पोलीस प्रशासन व रेल्वे प्रशासन यांच्यामार्फत दैनंदिन संयुक्त कारवाई केली जाते. याकामी महानगरपालिकेने कायमस्वरुपी विशेष पथक गठीत केले असून त्यामध्ये आवश्यक कर्मचारी, पोलीस कर्मचाऱ्यांसह दोन सत्रामध्ये नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच स्थानिक पोलीस व रेल्वे प्रशासनाकडील पोलीसांमार्फतही दैनंदिन कारवाई केली जाते. तसेच स्कायवॉक व रेल्वे परिसरातील रस्त्यांचे आणि प्रवासी सुविधेकरीता नियोजन करण्यात आले आहे.
(३) अनैतिक धंदे व गर्दुल्यांवर कारवाई करण्याबाबत महात्मा फुले चौक, पोलीस स्टेशन कल्याण (पश्चिम) यांना वेळोवेळी लेखी स्वरुपात कळविण्यात आले असून त्यांच्यामार्फत सुद्धा अनधिकृत फेरीवाले, गर्दुल्ले व इतर अनैतिक धंदेवाल्यांवर कारवाई सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील (जि.ठाणे) बीएसयुपी योजनेबाबत**

**(४८) ९२७७५ (२३-०८-२०१७). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने (जि.ठाणे) केंद्र शासनाच्या बीएसयुपी योजनेतून शहरातील गरिबांसाठी अडीज हजार घरे बांधली आहेत मात्र लाभार्थ्यांची यादी अजूनही महानगरपालिकेने निश्चित न केल्याने ही घरे पडून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीएसयुपी योजनेतून महानगरपालिकेने चार प्रकल्प तयार केले होते त्यानुसार किमान १७ ठिकाणी ही योजना उभारण्याचे काम हाती घेतले व सुरुवातीला १३००० घरे लक्ष ठेवून प्रत्यक्षात ८१८१ घरे बांधण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील बी.एस.यु.पी. योजनेच्या निकषानुसार एकूण १४७८ पात्र लाभार्थी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने निश्चित केले आहेत. या पात्र लाभार्थ्यांना सदनिका वितरीत करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(२) हे खरे आहे.

महानगरपालिकेने बी.एस.यु.पी. योजनेंतर्गत चार प्रकल्प अहवाल (DPR) तयार केले होते. त्यानुषंगाने निविदेप्रमाणे १७ पॅकेजनुसार ९ ठिकाणी कामे सुरु करण्यात आली असून, यामध्ये १३४६९ सदनिका बांधण्याचे उद्दीष्ट होते.

परंतू त्यानंतर निरनिराळ्या कारणास्तव डी.पी.आर. सिमीत करुन एकूण ८१८८ सदनिका तयार करण्यात येत आहेत. त्यापैकी २४६४ सदनिका बांधून पुर्ण झालेल्या आहेत, तर ४८०८ सदनिका बांधकामाच्या अंतिम टप्प्यावर असून माहे ऑक्टोबर, २०१७ अखेर पूर्ण होणार आहेत.

अतिरिक्त मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी दि.१९/०५/२०१७ रोजीच्या बैठकीत, अद्याप सुरु न झालेल्या उर्वरित ९१६ सदनिकांची कामे रद्द करण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार, सदर कामे रद्द करुन त्यांची रक्कम शासनास परत करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ब्रम्हपूरी नगरपरिषदेंतर्गत ( जि.चंद्रपूर) कोट तलाव सौंदर्यीकरणात कोटींचा गैरव्यवहार झाला असल्याबाबत**

**(४९) ९२८४२ (२३-०८-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड**

**पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी नगरपरिषदेंतर्गत (जि.चंद्रपूर) कोट तलाव सौंदर्यीकरणाचे काम पुजा कन्सट्रक्शन या कंपनीने केले असून कंपनीने तलावाचे काम पूर्ण न करताच कोट्यवधींचे काम कागदोपत्री दाखवून शासनाची आर्थिक फसवणूक केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने उच्चस्तरीय चौकशी करुन सदर कंपनीवर व मौका पाहणी न करता देयके मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१७) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

कंत्राटदाराने निविदा अटीत १ मीटर गाळ काढण्याची तरतूद असतांना त्यापेक्षा जास्त खोदकाम केले व ज्यादा देयकाची मागणी केली, जे मंजूर करण्यात आलेले नाही. त्याविरूद्ध कंत्राटदाराने सत्र न्यायालयात दावा दाखल केला. कंत्राटदाराचा करारनामा देखील रद्द करण्यात आला आहे. जादा देयके मंजूर झाले नसल्याने अधिकाऱ्यांवर कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(५०) ९३०५१ (२३-०८-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहराच्या आपत्ती निवारणाची जबाबदारी असलेल्या महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागावरच मनुष्यबळाअभावी आपत्ती ओढवत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक शहराचा विस्तार व लोकसंख्येच्या तुलनेत अग्निशमन विभागाकडे ५१७ अधिकारी व कर्मचाऱ्यांची आवश्यकता असतांना जेमतेम १५७ कर्मचाऱ्यांची संख्या आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, अग्निशमन विभाग अधिक सक्षम करण्यासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांचे पदे भरण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात सद्यस्थितीत तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील एकूण १५५ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

महानगरपालिकेने सादर केलेल्या आकृतीबंधात अग्निशमन विभागासाठी तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील एकूण ५४६ पदांचा समावेश आहे.

(३) दिनांक ०४ मे, २००६ च्या शासन निर्णयान्वये, महानगरपालिकांसाठी विहित केलेल्या आस्थापना खर्चाच्या मर्यादेपेक्षा नाशिक महानगरपालिकेचा आस्थापना खर्च जास्त असल्याने, महानगरपालिकेस सरळसेवेची रिक्त असलेली पदे भरता येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.